FORM-1A

0068606

N.C.R.B.
I.I.F.-I

## पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station भ्र.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 24, वर्ष Year 2023 दिनांक Date 24/10/2023.

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि.1988 कलमे Sections 7
   (ii) अधिनियम Act भादवि कलमे Sections 34, 201, 511
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शुक्रवार, तारीख पासून Date from 06/10/23, वेळ Time 12.04 तारीख पर्यंत Date to 28/10/23 वेळ Time 20.50

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 06/10/2023 वेळ Time 12.04

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 22/23 तारीख Date 24/10/23 वेळ Time 20.50

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मुलुंड पो.ठाणे, इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या वनविभाग कार्यालय असलेल्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर, ठिकाणाचे नंबर No. if any ........, गल्ली Ward ........, रस्त्याचे नाव Name of road ........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name फिरोज खान (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name अजमल.
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 42 वर्षे. (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8820706084
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste ........ जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : B-506, गल्ली / सर्व्हे नं. Ward हिरा पन्ना हेरिटेज रेसिडेन्सी, ओशिवरा डेपो समोर लिंक रोड ext. घर / नाव नं. House/Name No. ........ फोन / मो. नं. Phone/M. No. ........ पॅन नं. PAN No. ........ वोटर्स नं. Card No. गोरेगाव (प) 400104
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Dist. ........, राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   1) सुधा मुकुंदराव दायमा - वय-40 वर्षे. धंदा नोकरी (पद- पोलीस निरीक्षक - मुलुंड पो.ठाणे, मुंबई रा.डी. 1302, शालिवा बिल्डिंग, कायदा गौरव्यांची, ग्रासोड ठाणे.
   2) भोसा मारुती वनकळे - वय- 46 वर्षे. धंदा नोकरी (पद- पो.ह. 40840 - नेमणूक मुलुंड पोठाणे रा. बिल्डिंग-2-रूम-504, सर्वोदय नगर को-ऑ. सो. 60 फिट रोड डाकुर्ली. जि. ठाणे

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

Scanned with OKEN Scanner

यातील तक्रारदार श्री ब्रिजेंद्र वैजनाथ यादव वय ८२ वर्षे. यांचा आज रोजी स्वतंत्र पानावर संगणकावर मराठीत टंकलिखित केलेला जबाब हाच नमूद गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष.

Ajadhav
(विजया जाधव).
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
ठाणे

Bjadav
(Brijendra Yadav)

फिर्याद दिनांक १४/०७/२०२३

श्री. बिरेंद्र बैजनाथ यादव, वय ४१वर्षे, धंदा– व्यवसाय ( जिवन ज्योत चेरिटेबल ट्रस्ट ),ट्रस्टी रा.ठि.– बी/४०६, धिरजहेरिटेज रेसीडेंसी १, लिंकिंग रोड एक्सटेंशन, शास्त्री नगरसमोर, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४०० ०५४, मो.क्र. ९८२०१७६७४४

---

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर रहावयास आहे. माझेसोबत माझी पत्नी माझी एक मुलगी व माझी आई असे एकत्रित रहावयास आहे. माझा मेडीकलचा व्यवसाय असुन त्यातुन मिळणारे उत्पन्नावर माझा उदरनिर्वाह करीत आहे.

मी जिवन ज्योत चेरिटेबल ट्रस्ट, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई या चारीटेबल ट्रस्टचा ट्रस्टी आहे. तसेच माझे सोबत सदर संस्थेचे श्री. दिपक जैन हे ट्रस्टी आहेत. सदर संस्थेमार्फत मुंबई महानगरपालिकेती आ.सी.यु. विभागातील डॉक्टर पुरविण्याचे काम केले जाते. सदर संस्थेस बृहन्मुंबई महानरपालिका यांनी Dy. Ch. Eng./CPD/18/TDR/AE4 of 2017/2018 Date 17/05/2018 अन्वये मुंबई महानगरपालिकेच्या शासकिय रूग्णालयातील आय.सी.यु विभागात आय.सी. यु डॉक्टर तीन शिफट करीता 1MD/DNB Medicine or MD/DNB/DA Anesthesia व एक पी.जी. डॉक्टर सदर संस्थेमार्फत पुरविण्याबाबत निविदा प्राप्त झाली होती. सदर निविदा ही दि. १७/०५/२०१८ ते दि.१६/०५/२०२० या कालावधीपर्यंत होती.

श्री. गोल्डी देवकीनंदन शर्मा यांनी मुलूंड पोलीस ठाणे येथे जिवन ज्योत चॅरिटेबल ट्रस्ट, यांनी महानगरपालिकेने दिलेल्या निविदेनुसार अटी व शर्थीचे पालन न करता अग्रवाल हॉस्पीटल, मुलूंड येथील बोगस डॉक्टरांची नेमणुक करून चुकीचे उपचार केल्याने अग्रवाल हॉस्पीटल येथील आय.सी.यु विभागात रूग्णांना त्यांचा जीव गमवावा लागला अशा आशयाचा तक्रार अर्ज केला होता. सदर तक्रार अर्जाची चौकशी मुलूंड पोलीस ठाणे मार्फतीने चालू होती. त्यानंतर श्री. गोल्डी शर्मा यांनी मा. २७ वे न्यायालय येथे मिसलेनियस अर्ज क्र. १७२/एमआयएससी/ २०२३ कल १५६(३) अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत अर्ज केला असता सदरचा अर्ज मा.न्यायालयाने मान्य करून गुन्हा नोंद करणेकामी नमुद अर्ज मुलूंड पोलीस ठाणे पाठविला. त्यावरून मुलूंड पोलीस ठाणे येथे १) जिवन ज्योत चेरिटेबल ट्रस्ट,, सदर संस्थेचे ट्रस्टी २) बिरेंद्र यादव ३) ज्योती ठक्कर, ४) जे. सी. वकील, ५) रतनलाल जैन, ६) दिपक जैन, ७) दिप्ती मेहता, ८) बोगस डॉक्टर यांचे विरोधात गु.र.क्र. २९८/२०२३ कलम ११२, ११७, १२०(ब), ३०२, ३०७, ४१६, ४१९, ४६५, ४२६, ४७१, ३४, भादवि सह कलम ३३, ३३(अ), ३४, ३६, महाराष्ट्र मेडीकल प्रक्टीशनर अॅक्ट १९६१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्री. गोल्डी देवकीनंदन शर्मा यांनी जिवन ज्योत चेरिटेबल ट्रस्ट,, सदर संस्थेचे ट्रस्टी व माझे विरोधात मुलूंड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केल्यानंतर मला मुलूंड पोलीस ठाण्याचे तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री.भूषण दायमा यांनी चौकशीकामी बोलाविले. मी पोलीस निरीक्षक श्री. भूषण दायमा यांची पोलीस ठाणेस जावुन भेट घेतली असता त्यांनी मला सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असुन मला व जिवन ज्योत चेरिटेबल ट्रस्टचे एच.आर मॅनेजर श्रीमती सुरेखा चव्हाण, व संस्थेचे इतर ट्रस्टी यांना सदर गुन्हयात अटक करण्यात येणार असल्याचे सांगितले व माझेकडे सदर गुन्हयातील अटक टाळण्यासाठी रू.२५,००,०००/– रक्कमेची मागणी केली.

त्यानंतर मी मा. ६० वे सत्र न्यायालय, मुंबई येथे अटकपुर्व जामीन अर्ज क्र.११३३/२३, दि. १९/०५/२०२३ अन्वये अर्ज केला असता मा.न्यायालयाने मला मुलूंड पोलीस ठाणे येथे दिवसातुन एक वेळा

समक्ष,

( विदया जाधव ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबइ

(Birendra Yadav)

Scanned with OKEN Scanner

दोन तास हजेरी आदेशित केले. त्याप्रमाणे मी मुलूंड पोलीस ठाणे येथे दररोज हजेरी देण्याकरीता जात होतो त्यावेळी पो.नि. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांनी माझेकडे रू. २,५०,०००/– रक्कम देण्याचा तगादा लावला होता. त्यानंतर पो.नि. श्री. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांनी माझेकडे वेळोवळी रक्कमेची मागणी केली असता मी भीतीपोटी माझे वकील नामे श्री.संदिप सिंग यांचे मार्फत मुलूंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. भूषण दायमा यांना दि. ०१/०६/२०२३ रोजी रू. १,००,०००/– रक्कम दिली.

त्यानंतर मी मुलूंड पोलीस ठाणे येथे दररोज हजेरी देण्याकरीता जात होतो त्यावेळी पो.नि. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांनी मला उर्वरीत रू. १,५०,०००/– रक्कम देण्याचा तगादा लावला होता. त्यानंतर पो.नि. भूषण दायमा यांनी मला सांगितले की, माझा सत्र न्यायालयातील अटकपुर्व जामीन नामंजुर होणार असुन मला उच्च न्यायालय येथे अटकपुर्व जामीन अर्ज करेपर्यंत मला अटक न करण्याकरीता प्रत्येकी दिवशी रू. १,००,०००/– प्रमाणे देण्याची मागणी केली. त्यानंतर पो.नि दायमा यांनी मला सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करतेवेळी सदर गुन्हयातील कलमे कमी करून गुन्हयाचे स्वरूप कमी करण्यासाठी रू. ५,००,०००/– माझेकडे मागितले. पो.नि. दायमा यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांनी माझा जबाब नोंद करताना माझेकडे स्वतंत्र पैशाची मागणी केली. पो.नि. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस हे मी हजेरी देण्याकरीता मुलूंड पोलीस ठोणे येथे जात असताना वेळोवेळी माझेकडे पैशाची मागणी करीत होते.

मला मुलूंड पोलीस ठाण्याचे पो.नि. श्री. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी दि. ०७/०७/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथील कार्यालयात गेलो व तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो असता त्यांनी मला पो.नि. विदया जाधव मॅडम यांचे कार्यालयात पाठविले. पो.नि. जाधव मॅडम यांनी माझेकडुन पो.नि. श्री. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांचे विरोधात लाचेची मागणी करीत असलेबाबतचा तक्रार अर्ज स्वहस्ताक्षरात इंग्रजी भाषेमध्ये लिहून घेतला. पो.नि. विदया जाधव मॅडम यांनी सदर अर्जावर माझी सही घेतली. त्यानंतर पो.नि. विदया जाधव या मला स.पो.आ. साळूंखे पाटील यांच्याकडे घेवुन गेले. तेथे माझी स.पो.आ. साळुंखे पाटील व तेथे उपस्थित असलेले दोन शासकीय पंचांशी आणि उर्वरीत पोलीस पथकाशी माझी ओळख करून दिली.त्यानंतर पो.नि. विदया जाधव यांनी पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगून मी दिनांक ०७/०७/२०२३ रोजी केलेला तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पो.नि. विदया जाधव यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पो.नि. विदया जाधव यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात घेतला.

पो.नि. विदया जाधव यांनी दि. ०८/०७/२०२३ रोजी माझे अर्जावर कारवाई करण्यात येईल असे मला सांगितले होते. परंतु माझे वैयक्तिक अडचणीमुळे मला लाप्रवि कार्यालयात दोन ते तीन दिवस येता येणार नसुन मी दि. ११/०७/२०२३ रोजी ला.प्र.वि कार्यालयात येणार असल्याचे मी पो.नि. विदया जाधव यांना मोबाईल फोनवरून सांगितले. पो.नि. विदया जाधव यांना सांगितल्याप्रमाणे मी दि. ११/०७/२०२३ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथील कार्यालयात सकाळी ११.०० वाजता हजर झालो.

त्यानंतर पो.नि विदया जाधव यांनी दिनांक ११/०७/२०२३ रोजी पंचांसमक्ष मुलूंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या

समक्ष,

Jadhav

( विदया जाधव ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Yadav
Birendra Yadav

Scanned with OKEN Scanner

बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि विदया जाधव यांनी माझी पडताळणी पथकाची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह शासकीय वाहनाने व मी माझे सफेद रंगाच्या टोयोटो फॉच्युनर मो/कार क्र. एम.एच०२डयू २२५८ ने निघून नवघर पोलीस ठाणेच्या हद्दीतील संभाजी गार्डनच्या बाजुला मुलूंड पुर्व येथे वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि.विदया जाधव यांनी मुलूंड पोलीस ठाणे येथील ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांचे कार्यालयात पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. उदय गसम यांचे सह माझे खाजगी मो/कारने पाठविले. लोकसेवक श्री. भूषण दायमा हे कार्यालयात उपस्थित होते. माझे व लोकसेवकामध्ये माझे कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर पो.नि. श्री. भूषण दायमा यांनी माझे सोबत असलेले पं. श्री. उदय गसम यांचेबाबत माझेकडे विचारणा केली व त्यांना त्यांचे कार्यालयाच्या बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. भूषण दायमा यांनी टेबलच्या ड्रॉव्हरमधुन एक कागद बाहेर काढला व त्यावर " मै कूछ नही बोलुंगा, अमाऊंट के बदले डॉक्यूमेंट बोलना " असे लिहिले. त्याच कागदावर त्यांनी अंकामध्ये २५ असे लिहून मला दाखविले. त्यावर मी काहिच प्रतिक्रिया न दिल्याने पो.नि. दायमा यांनी सदरचा कागद माझे समोरच फाडला. त्यानंतर मी पो. नि. दायमा यांनी मागितलेल्या रक्कमेची अर्धी रक्कम करण्याची विनंती केली. त्यानंतर त्यांनी छोटया कागदावर H. S असे लिहून हायकोर्ट येथे माझे वकील श्री संदीप सिंग यांचे मार्फतीने अटकपुर्व जामीनचा अर्ज करण्याचे होटांची हालचाल करून सांगितले व त्यानंतर 5 अंक लिहून त्यासाठी कागदावर 5-3-2 असे लिहून " अभी दो दिन मे, ये दो असे बोलुन कागदावर want -5-0 असे लिहून दाखविले. अशाप्रकारे पो.नि. दायमा यांनी कोडयामध्ये व इशाऱ्याने कागदावर लिहून लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी संभाजी गार्डनच्या बाजुला मुलूंड पुर्व परिसरात उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. विदया जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत पंचांना व मला विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. मुलूंड पोलीस ठाणे येथील लोकसेवक श्री. दायमा याने पडताळणी दरम्यान लाचेची कोडयामध्ये व इशाऱ्याने कागदावर लिहून मागणी केल्याने पुन्हा पडताळणी करणार असल्याचे सांगुन पडताळणी कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पो.नि. विदया जाधव यांनी मला घरी जाण्यास सांगितले व दि. १३/०७/२०२३ रोजी ला.प्र.वि कार्यालयात बोलाविले.

पो.नि. विदया जाधव यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दि. १३/०७/२०२३ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. त्यानंतर पो.नि विदया जाधव यांनी दिनांक १३/०७/२०२३ रोजी पंचांसमक्ष मुलूंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी पुन्हा पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियानलाडिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे मला सांगितले.

पो.नि विदया जाधव मी व पोलीस पथक ला.प्र.वि. कार्यालयातून निघून नवघर पोलीस ठाणेच्या हद्दीतील संभाजी गार्डनच्या बाजुला मुलूंड पुर्व येथे शासकीय वाहनासह थांबलो. त्यानंतर मला पो.नि.विदया जाधव यांनी मुलूंड पोलीस ठाणे येथील ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. भूषण दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश वनकळस यांचे कार्यालयात पडताळणीकरीता पोलीस पथकातील श्री गायकवाड यांच्या मदतीने डिजीटल रेकॉर्डर चालू करून

समक्ष,

( विदया जाधव ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

B.yadav
(Birendra Yadav)

शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून माझे खाजगी मो/कारने पाठविले असता लोकसेवक श्री. भूषण दायमा हे त्यांचे कार्यालयात उपस्थित होते. माझे व लोकसेवकामध्ये माझे कामासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर लोकसेवक श्री. भूषण दायमा यांनी कोडयामध्ये व इशाऱ्याने कागदावर लिहून "मै तुमको कल बताया था जो डॉक्युमेंट है वो, दे दो", असे सांगुन हाताने इशारा करून रू.३,००,०००/– रक्कमेची लाचेची मागणी केली.

त्यानंतर मी संभाजी गार्डनच्या बाजुला मुलूंड पुर्व येथे उभ्या असलेल्या पोलीस वाहनाजवळ परत आलो. पो.नि. विदया जाधव यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत पंचांना व मला विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण पंचासमक्ष ऐकले. मुलूड पोलस ठाण्याचे पो.नि. श्री. दायमा याने पडताळणी दरम्यान लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने व लोकसेवक याने लाचेची रक्कमेचा पहिला हप्ता रू.३,००,०००/–दि. १४/०७/२०२३ रोजी घेवुन येण्यास सांगितल्याने पो.नि. विदया जाधव यांनी पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पो.नि. विदया जाधव यांनी मला घरी जाण्यास सांगितले व लाचेच्या मागणीप्रमाणे मला रू. ३,००,०००/– ची व्यवस्था करून दि. १४/०७/२०२३ रोजी लाप्रवि कार्यालयात येण्यास सांगितले.

पो.नि. विदया जाधव यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दि. १४/०७/२०२३ रोजी लाप्रवि कार्यालयात हजर झालो. पो.नि. विदया जाधव यांनी माझेकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे बचतीमधील रू. २,००,०००/– (भारतीय चलनाच्या रू. ५०० दराच्या ४०० नोटा) सोबत आणली असल्याचे सांगितले. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेऊन माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २,००,०००/– (भारतीय चलनाच्या रू. ५०० दराच्या ४०० नोटा) ताब्यात घेतल्या. त्यानंतर नमुद नोटांच्या छायांकित प्रती लाप्रवि कार्यालयाच्या झेरॉक्स मशिनवर काढुन घेतल्या.

पो.नि. विदया जाधव यांनी आज दि. १४/०७/२०२३ रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगुन मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे कडुन घेण्यात आलेली रक्कम रू. २,००,०००/– (भारतीय चलनाच्या रू. ५०० दराच्या ४०० नोटा) नोटांना अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन अँथ्रासीन पावडरचे व अल्ट्रावायलेट दिव्याचे गुणधर्म समजावुन सांगितले. पो.नि. विदया जाधव यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मला उजव्या हाताने थम करून पुर्वनियोजीत इशारा करावा असे सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्वनियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले. त्यानंतर लाप्रवि कार्यालयातील गोपनीय कक्षात पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेस अँथ्रासीन पावडर लावून सदरची रक्कम मी सोबत असलेल्या एका सफेद रंगाच्या छोटया कागदी पिशवीत ठेवुन सदर पिशवी मी सोबत आणलेल्या फिकट क्रिम रंगाच्या कापडी पिशवीत ठेवली.

त्यानंतर पो.नि. विदया जाधव यांनी माझी सापळापुर्व/सापळा पथकाची व पंचांची ओळख करून देवून ला.प्र.वि. कार्यालयातून पोलीस पथकासह निघून नवघर पोलीस ठाणेच्या हद्दीतील संभाजी गार्डनच्या बाजुला मुलूंड पुर्व येथे आलो. त्यावेळी पो.नि. विदया जाधव यांनी मला सुचना देवुन,एसीपी साहेबांना व पोलीस अंमलदार श्री. गायकवाड यांना माझे गाडीतुन मुलुंड पोलीस ठाण्याचे दिशेन जाण्यास सांगितले आम्ही मुलुंड पोलीस ठाण्याचे नजदिक असलेले सिग्नल जवळ पोहचले असता एसीपी साहेबांनी आमचे गाडीत बाजुस थांबवुन पोलीस अंमलदार गायकवाड याचे मार्फतीने माझे शर्टाचे आतील बाजुस असलेल्या बनियानला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून अडकविल्यानंतर मी गाडीतुन उतरून पायी मुलुड पोलीस ठाण्याचे दिशेने निघालो. माझे पाठोपाठ पोलीस पथक व पंच काहि अंतर ठेवून होते. मी लोकसेवक यांच्या कार्यालयाजवळ गेला असता

समक्ष,

(signature)

( विदया जाधव ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(signature) Yadav
(Birendra Yadav)

Scanned with OKEN Scanner

लोकसेवक पो.नि. श्री दायमा हे त्यांचे कार्यालयात उपस्थित होते. मी त्यांचे केबीनमध्ये गेलो असता त्यांच्या केबीनमध्ये इतर पोलीस हे उपस्थित असल्याने पो.नि. दायमा यांनी मला त्यांच्या केबीनच्या बाहेर थांबण्यास इशारा केला. त्यानंतर काहि वेळाने पो.नि. दायमा यांनी मला केबीनमध्ये येण्यास सांगितले. मी केबीनमध्ये गेल्यानंतर '' तीन के जगह पूरा नही हो रहा है, दो लाख ही हो रहा है, दो लाख ही लाया हू, असे पो.नि. दायमा यांनी सांगितले. त्यानंतर लोकसेवक पो.नि. दायमा यांनी मला न बोलण्याचा इशारा करून त्यांचे पाठोपाठ कार्यालयाच्या मागील बाजुस येण्यास सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. दायामा यांच्या मागुन पायी चालत कार्यालयाच्या इमारतीबाहेरील मोकळया जागेतुन मुलूंड पोलीस ठाणेच्या पाठीमागील बाजुस जात असताना पोलीस हवालदार श्री. वनकळस हे आमचे मागोमाग येत असल्याचे मी पाहीले मी व दायमा साहेब पोलीस वसाहतीच्या उजव्या बाजुस असलेल्या वन प्लस वन पक्क्या रूमच्या पहिल्या मजल्यावरील केबीनमध्ये जात असताना पो. ह. वनकळस हे खालीच थांबले आम्ही केबीन मध्ये गेल्यावर मी कामाबाबत चर्चाकरीत असताना पो.नि. दायमा यांनी त्यांच्याकडील ऑरेंज रंगाची एक कापडी पिशवी घेतली व अंगुलीनिर्देश करून तसेच नजरेच्या इशाऱ्याने सदर कापडी पिशवीमध्ये लाचेची रक्कम टाकण्याचा इशारा केला. त्यावेळी मी माझे कडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू २,००,०००/– (रू. ५००/– दराच्या ४०० भारतीय चलनी नोटा )ही ठेवलेल्या फिकट क्रिम रंगाच्या कापडी पिशवीसह लोकसेवक यांच्या हातातील ऑरेंज रंगाच्या कापडी पिशवी मध्ये ठेवली. त्यावेळी पो.नि. दायमा यांच्याशी कामाबाबत चर्चा करून केबीन मधुन बाहेर जात असताना ''हाजीरी पे नही आया था क्या '' अशी विचारणा केली. त्यावेळी मी पो.नि. दायमा यांना '' बिचमे आया था दो.....तीन दिन.... आया था...असे सांगितले. त्यानंतर मी केबीनच्या बाहेर येवुन पाहिल्या मजल्यावरून शिडीने खाली आलो तेव्हा पोलीस हवालदार वनकळस हे तेथेच थांबले होते मी पुढे जावुन सापळा पथकास दिसेल अशारीतीने उजव्या हाताने थम करून सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला त्यावेळी पोलीस पथक हे वन प्लस वन पक्क्या रूमच्या पहिल्या मजल्यावरील केबीनमध्ये गेले व त्यांनी लोकसेवक पो.नि.श्री. दायमा यांना ताब्यात घेतले. काहीवेळातच पोलीस हवालदार वनकळस यांना देखील वरती घेवुन आले.

त्यानंतर पोलीस पथकातील अंमलदाराने मला पुन्हा केबीनमध्ये बोलाविले सदर वेळी पोलिसांनी त्या लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे संपुर्ण नाव श्री. भुषण मुकुंदलाल दायमा वय ४० वर्षे धंदा– नोकरी (पोलीस निरीक्षक), मुलूंड पोलीस ठाणे, मुंबई रा.ठि. फ्लॅट क्र. १३०२,अलीया बिल्डिंग, काब्रा गॅलेक्सी, ब्रम्हांड ठाणे पश्चिम असे असल्याचे मला,पंचांना व पोलिस पथकास समजले. तसेच पोलीस पथकाने पो.नि. दायमा यांचे मदतनीस श्री. रमेश मच्छिंद्र वनकळस वय ४६ वर्षे, धंदा – नोकरी (पोलीस हवालदार), मुलूंड पोलीस ठाणे, मुंबई रा.ठि. बिल्डिंग क्र.२, रूम क्र.४०४, सर्वोदय मंगल को.ऑप.हौ.सोसा. लिमि. ९० फिट रोड, ठाकुर्ली पुर्व कल्याण, जि.ठाणे असे असल्याचे मला, पंचाना व पोलिस पथकास समजले.

तरी, मुलूंड पोलीस ठाणे, मुंबई येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक श्री. भुषण मुकुंदलाल दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश मच्छिंद्र वनकळस, पोलीस हवालदार यांनी माझेकडे माझा सत्र न्यायालयातील अटकपुर्व जामीन नामंजुर होणार असुन मला उच्च न्यायालय येथे अटकपुर्व जामीन अर्ज करेपर्यत मला अटक न करण्याकरीता, तसेच सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करतेवेळी सदर गुन्हयातील कलमे कमी करून गुन्हयाचे स्वरूप कमी करण्यासाठी रू.२५,००,०००/– रक्कमेची मागणी केली. त्यानंतर तडजोडीअंती रू. ११,००,०००/– घेण्याचे कबुल करून त्यापैकी दुसरा हप्ता रू. २,००,०००/– ही रक्कम दि. १४/०७/२०३ रोजी माझेकडून स्विकारली म्हणुन माझी पोलीस निरीक्षक श्री. भुषण मुकुंदलाल दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश मच्छिंद्र वनकळस, पोलीस हवालदार यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

समक्ष,

Jadhav

( विदया जाधव ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Bdav
(Birendra Yadav)

Scanned with OKEN Scanner

 

मुलूंड पोलीस ठाणे, मुंबई येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक श्री. भुषण मुकुंदलाल दायमा व त्यांचे मदतनीस श्री. रमेश मच्छिंद्र वनकळस, पोलीस हवालदार यांचेशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्याघेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब हा मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केला असून तो मला मराठीतुन वाचून हिंदीतुन समजावुन सांगितला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

( विदया जाधव ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

(Birendra Yadav)

Scanned with OKEN Scanner